


**आ**फ्रिकेच्या जंगलाविषयी सर्वप्रथम शाळेत असताना ओळख झाली होती. तिथल्या वन्यजमाती, हिंस्त्र श्वापदे, घनदाट जंगल वगैरे अद्‌भुत गोष्टी खूप रोमांचक वाटत होत्या. टारझन, डेंकालीचा वेताळ यांच्या सुरस कथांमधून आफ्रिकेच्या जंगलाची सहल घडत होती. मात्र तिथे प्रत्यक्ष जाऊ असे स्वप्नातदेखील वाटले नव्हते. डोंगरभटकंतीचा छंद जडल्यावर एकट्याची भटकंती सुरू झाली. एव्हरेस्टच्या पायथ्याशी जाऊन आल्यावर पुन्हा तसलेच काहीतरी साहस करण्याची खुमखुमी आली. मग टांझानियातील 'किलीमांजारो' पर्वतावर जाण्याचे ठरवले. पायथ्यापासून असलेला हा सर्वात उंच पर्वत सुमारे १६,००० फूट सरळसोट उभा असल्याने व पैशाच्या गणितामुळे फक्त किलीमांजारो करण्याचे ठरवले. मात्र इतक्या लांब जातोच आहे तेव्हा जगप्रसिद्ध आफ्रिकन सफारी करावी अशी सौ. नी सल्लावजा इच्छा व्यक्त केली. खरेतर सफारी हा माझा प्रांत नव्हे. एका उघड्या गाडीत बसून बंदुकधाऱ्या गाईडबरोबर मोठ्या प्राणीसंग्रहालयात अशाप्रमाणे भटकंती अशी माझी (गैर) समजूत होती. त्यामुळे प्रथमदर्शनी मी विशेष उत्साह दाखवला नाही. किलीमांजारोची आखणी करताकरता जंगलसफारीची माहिती घेऊ लागलो. तेव्हा असे लक्षात आले की, बायको देते ते सगळेच सल्ले तितके वाईट नसतात. उत्सुकतेचे रूपांतर गंभीर योजनेत कधी झाले ते समजलेच नाही. केनिया अथवा टांझानियाला बहुतांशी दोन प्रकारचे पर्यटक जातात. किलीमांजारो, मेद पर्वताला गवसणी घालणारे साहसी गिर्यारोहक आणि दुसरे म्हणजे जंगलसफारी, वन्यजमातींचा अभ्यास करणारे काहीसे असाहसी प्रवृत्ती असणारे. पैशाचे गणित बसवणे सर्वांच्याच हातात नसल्याने दोन्ही करणारे खूप कमी असतात. मलाही हे गणित बसवणे खूप कठीण गेले परंतु वडिलांच्या शिकवणीनुसार पर्यटनाला महत्त्व देऊन दोन्ही प्रकारच्या सहली करण्याचे ठरले. इंटरनेटवरून एम. जे. सफारीची निवड केली. जॅकमन ल्यीमो याच्याशी फोनवर बरेच दिवस संवाद झाले. माणूस इमानदार व विश्वासार्ह वाटला. मी ग्रुपबरोबर नसून एकटा असल्याने माझ्याकडून विशेष फायदा नसल्याने तो कितपत सेवा देईल, याबद्दल शंका होती. मात्र तो शब्दाला जागला. 'किलीमांजारो'ची साहसपूर्ण यात्रा त्याने उत्तमरित्या घडवली. पाच रात्री सहा दिवस सुमारे १६००० फूट खडी चढण, सुमारे ६० कि.मी.ची पायपीट तेवढीच उतरण केल्यावर मी थकलो असेन अशी त्याची समजूत होती. मात्र किलीमांजारोहून आल्याआल्या मी लगेच दुसऱ्या दिवशी सफारीला जाण्याची तयारी दाखवली. माझा उत्साह पाहून जॅकसन अचंबित झाला. शुक्रवारी २६ ऑगस्ट रोजी किलीमांजारोहून परतलो. २७ ऑगस्ट रोजी 'मोशी' गावात विश्रांती वजा फेरफटका मारण्याचे ठरवले. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी रविवारी आफ्रिकेच्या विविध जंगलात सफारी करण्याचे ठरवले. चार दिवस तीन रात्र विविध जगप्रसिद्ध अभयारण्यांत फेरफटका मारण्याचा बेत आखला.

जंगलसफारी म्हणजे एका उघड्या वाहनात प्रवाशांना बसवले जाते. त्या वाहनाचे छप्पर उघडू शकते की, जेणेकरून प्रवासी उभे राहून सभोवताल पूर्णपणे न्याहाळू शकतात. गाडीच्या चारही चाकांना इंजिन जोडल्याने ती खाचखळग्यातून जंगलातून विनासायास जाऊ शकते. बरोबर ड्रायव्हर वजा गाईड असतो. तो गाडी चालवण्याबरोबरच आजूबाजूची माहिती देतो. संस्कृती, झाडे, प्राणी, गमतीजमती वगैरे. प्रत्येक अभयारण्यात पायवाटासमान रस्ते असतात. त्यावरून या गाड्या जातात. हे रस्ते बहुतांशी गाड्या जाऊन अथवा प्राण्यांमुळे निर्माण झालेले असतात. प्राण्यांचा मागोवा घेत ड्रायव्हर गाडी चालवतो व प्रवाशांना माहिती देतो. वाटेत प्राणी दिसले की गाडी थांबवतात.

पहाटे चारला गजर झाला. बॅगा वगैरे रात्रीच भरून ठेवल्या होत्या. किलीमांजारोप्रमाणे खूप तयारी करावी लागली नाही तरीसुद्धा सुटकेसमध्ये काही जोड कपडे, औषधे व जुजबी सामान घेतले. पाठीवर छोटी सॅक की ज्यात व्हिडिओ कॅमेरा, कॅमेरा, टोपी वगैरे घेतले. आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या मोठ्या बॅगा व लॅपटॉपची बॅग भरून ऑफिसात जमा केली. विमान कंपन्या देतात त्याप्रमाणे पावत्या मिळाल्या.

अटलांटाला असताना सखोल योजना आखताना काही दिवस जास्तीचे जमेस धरले होते. किलीमांजारोला अधिक वेळ लागला तर, काही अघटित कारणे किंवा सफारीसाठी दोनचार दिवस वाढवून पुढच्या प्रवासाची तारीख ठरवली होती. मात्र सफारीनंतर विशेष काही करण्यासाठी आढळले

नाही. तेव्हा पाचसहा दिवसांनी अलीकडेच पुढील प्रवासाचा बेत ताबडतोब आखला. टांझानियात फुकट वेळ घालण्यापेक्षा पुण्याला आधी गेलो तर गणेशोत्सवाचे आणखी काही दिवस मिळू शकतील व आईबरोबर जास्ती सहवास मिळू शकेल असा तातडीने विचार केला. सफारीला जाण्याच्या आदल्या रात्री विचारचक्रे फिरली. विमानकंपनीला फोन केला. माझ्या सोयीच्या उड्डाणाच्या दिवशी एकच जागा शिल्लक होती. सुमारे तीनशे डॉलर अधिक द्यावे लागणार होते. मात्र हे पैसे किलीमांजारोच्या विमानतळावर ठराविक वेळेतच नेऊन द्यावे लागणार होते. विमानकंपनीचा स्थानिक कर्मचारी खूपच समजूतदार होता. फोनवरून त्याने जागा राखून ठेवली. दुसऱ्या दिवशी मी सफारीला निघणार होतो. तेव्हा हे कसे शक्य होणार याची काळजी होती. जॅक्सनला फोनवरून परिस्थिती सांगितली. त्यांचे ड्रायव्हर रोज किलीमांजारो विमानतळावर जात असतात. काम जोखमीचे होते. तीनशे डॉलर्स ही रक्कम टांझानियात खूप मोठी होती. मात्र माझ्या अनुभवावरून ड्रायव्हर, सफाई कामगार वगैरे लोकांवर पूर्ण भरोसा ठेवण्यास हरकत नसते. अशा लोकांवर विश्वास टाकणे हेच त्यांना मोठे वाटते. एका पाकिटात मी रक्कम व छोटी चिठ्ठी टाकली व ती हॉटेलच्या मॅनेजरला दिली. चिठ्ठीवर माझ्या उड्डाणाच्या बदलासंबंधी लिहिले व सही करून ड्रायव्हरला तशी परवानगी देतो आहे याचा उल्लेख केला. ड्रायव्हरने इमानेइतबारे पाकीट विमानकंपनीच्या ऑफिसात नेऊन दिले. मी सफारीच्या मार्गावर असताना ई-मेलने माझ्या उड्डाण बदलाविषयी समजले. फार मोठा जुगार यशस्वी झाला. सारे सुरळीत पार पडल्याने जीव भांड्यात पडला.

बरोबर साडेपाचच्या ठोक्याला मोठी व्हॅन आली. आत जर्मन जोडपे बसलेले होते. मी ड्रायव्हरच्या शेजारी बसलो. किलीमांजारो विमानतळ मोशी व अरुषाच्या मध्यावर आहे. मोशी गावाला वळसा घालून अरुषा या त्याहून मोठ्या गावाकडे कूच केली. सुमारे १०० कि.मी अंतरावरील अरुषा मोशीपेक्षा तीनचार पटीने मोठे होते. मोशी हे अत्यंत प्रसन्न व स्वच्छ गाव होते. किंबहुना आफ्रिका खंडातील हे सर्वात स्वच्छ गाव समजले जाते. त्यामानाने अरुषा बकाल वाटले. सुमारे ८ वाजता अरुषाला पोहोचलो. दिवस उजाडला होता. रस्त्यावर वाहनांची गर्दी वाढू लागली. खांदापालट का काय म्हणतात त्याप्रमाणे आम्हा तिघा प्रवाशांना दुसऱ्या एका गाडीत बसवले. विमान कंपन्या करतात त्याप्रमाणे हा व्यवसाय चालत असावा. आजूबाजूच्या गावातील पर्यटक एका मध्यवर्ती गावात आणून पुढील योजना आखली जात असावी. अरुषावरून निघालो. तासाभराने एका फाट्यावरून पुढील मुक्कामी पोहोचलो. वाटेत रानटी हत्ती दिसले. आफ्रिकेच्या जंगलात पाहिलेला हा पहिला प्राणी. 'फलाका' नावाच्या रिझॉर्टवजा वस्तीवर पोहोचलो. तिथे चहा, कॉफी, नाश्तावगैरेचा सरंजाम होता. सारी व्यवस्था चोख होती. स्वच्छ, टापटीपपणा आढळला. खाण्याबाबतीत कुठलीही काटकसर आढळली नाही. देशोदेशीचे पर्यटक हास्यविनोदात रमले. मी जसा एमजे सफारीमधून आलो होतो तसे इतर विविध कंपन्यातून आलेले होते. या सगळ्यांची मोट बांधून पुढील प्रवास घडणार होता. इथे आमच्या खऱ्याखुऱ्या ड्रायव्हर कम गाईडशी ओळख झाली. गाडी ऐसपैस होती. त्याचे छप्पर उघडू शकत होते. काचा भल्यामोठ्या होत्या. सर्वांना घेऊन गाडी फनाका कँपसाईट वरून निघाली. ड्रायव्हरबरोबर मदतनीस कम स्वैपाकी होता. गाडीत आमच्या सामानाबरोबरच पुढील तीन दिवसांचे रेशनपाणी घेण्यात आले होते. रस्ते कमालीचे सुंदर होते. आजूबाजूची गावं भारतातल्याप्रमाणे भासत होती. आता हळूहळू लोकवस्ती विरळ होऊ लागली. गावे संपली. वातावरण जंगलमय झाले. माणसांचा मागमूस जाणवत नव्हता. तासाभरात गाडी 'नरोंगोरो राष्ट्रीय उद्याना'जवळ येऊन पोहोचली. एका भल्यामोठ्या कमानी खाली लहानसे ऑफिस व माहिती देणारे संग्रहालय होते. प्रवेशाचे सोपस्कार पार होईपर्यंत मी त्या संग्रहालयात चक्कर मारली.

नोरोंगोरो विवर हा निसर्गाचा अद्‌भुत नमुना समजला जातो. स्वतंत्रपणे प्राणीजीवनाची जोपासना करणारे हे जगातले सर्वात मोठे विवर समजले जाते. जागतिक वारसा म्हणून यांची नोंद झालेली आहे. सुमारे २५,००० वेगवेगळे प्राणी या २० कि.मी. व्यासाच्या वर्तुळाकार विवरात गुण्यागोविंदाने हजारो वर्षे नांदत होते. सुमारे ६०० मीटर खोलीचे विवर ज्वालामुखीतून निर्माण झाले. इथे झाडी, पाणी, माती वगैरे जीवनावश्यक गोष्टी मुबलक आहेत. त्यामुळे हे विवर स्वतंत्र विश्व म्हणून वावरते. इथल्या प्राण्यांना स्थलांतरित होण्याची गरज भासत नाही. अन्नसाठवणी म्हणजे नेमके काय हे इथे चांगलेच अनुभवता येते. झाडपाल्यावर तृणजीवी जनावरे त्यांवर अवलंबून असलेली हिंस्र श्वापदे, त्यांची विल्हेवाट लावणारी गिधाडे इतर पक्षी. हे सारे एका मर्यादित भौगोलिक क्षेत्रात बघायला मिळते. बिबळ्या, सिंह, हत्ती, चित्ता, झेब्रा, विशेष प्रकारची हरणं, शहामृग, तरसं, रानम्हशी, रानडुक्कर, गेंडा, माकडे, पाणघोडे, करकोचे वगैरे अगणित प्राण्यांची रेलचेल पाहायला मिळते. वाटेत बरेच पाणवठे आढळले. खुरटी झाडे बहुतांशी होती. मात्र काही मोठी झाडेही आढळली. अशा झाडांवर बिबळ्यांचा वावर असतो. सुमारे २०० वर्षांपूर्वी मसाई जमात इथे स्थिरावली. सुमारे ४००००मसाई विविध अभयारण्यात राहतात. निसर्गाशी त्यांनी मिळतेजुळते राहून समतोल साधला आहे. काळ्याकभिन्न रंगांचे, अंगावर लालभडक किंवा निळ्या रंगाचे भलेमोठे कापड परिधान केलेले मसाई धीरगंभीर

भासले. केवळ त्यांनाच या भागात राहण्याची परवानगी आहे. इतर कुणाला विवरात किंवा त्याच्या आजूबाजूला राहण्याची परवानगी नाही. मसाई लोकं गुरं राखतात. बांबूच्या झोपड्यात राहतात. त्यांच्या वस्त्यांभोवती लाकडांचे भलेमोठे कुंपण असते, की जेणेकरून हिंस्त्र प्राणी वस्तीत प्रवेश करणार नाहीत. दिवसभर गुरांना चरवून आणल्यावर मसाई गुराखी गुरांना वेगळ्या बंदिस्त जागेत ठेवतात. हातात लांब काठी घेतलेला मसाई पुरुष उंच व काटक भासला. अनवाणी अथवा जाड कातड्यांच्या चपला घालून मसाई मैलोनमैल गुराढोरांमागे भटकत असतात. जवळील गावात दूध व दुग्धजन्य पदार्थ देऊन ते जीवनावश्यक गोष्टी आणतात.



**टेरेंगीरी राष्ट्रीय अभयारण्यातील प्राण्यांचे सहजीवन**

गाडी घाटवजा रस्त्यावरून विवरात उतरली. सर्वप्रथम पाणवठ्यांवरील झेब्रांनी आमचे स्वागत केले. पाणवठ्यावर करकोचा व तत्सम पक्षी मासे खाण्यात मग्न असावेत. गोलाकार डोंगररांग होती. त्यातील या सखल प्रदेशात गाड्यांनी फिरण्यासाठी पायवाट वजा मार्ग आखलेले होते. वेगवेगळ्या कंपन्यांच्या गाड्या असल्या तरीही ड्रायव्हर लोकं बिनतारी संदेशाने एकमेकांच्या संपर्कात असतात. त्यामुळे चित्ता, गेंडा, बिबट्यावगैरे अतिदुर्मिळ प्राणी कुठल्या भागात आहेत हे समजते. रस्त्याच्या कडेला तरसांची टोळी खुरडत चाललेली होती. काही रानडुक्कर चिखलात मनसोक्त लोळत होते. पुण्यातील एक शिकारी श्री. फणसे यांच्या 'शिकारीतील गमतीजमती' या पुस्तकाची आठवण झाली. ६०-७०च्या दशकात कात्रज, भिलारेवाडी भागात रानटी प्राणी मुबलक आढळत असत. उंच मानेचा शहामृग दूरवरून डौलात चालताना आढळला. असं म्हणतात की तो लाथेने सिंहाला घायाळ करू शकतो. रानम्हशी मुबलक दिसत होत्या. वेगवेगळ्या प्रजातींची हरीणे कळपाने भटकत होती. चिंकारा, इंपाला, सांबर वगैरे मुबलक चाऱ्यामुळे धष्टपुष्ट भासत होते. सारे साऱ्यांनाच मुबलक मिळत असल्याने कुठेही वखवख आढळली नाही. काँक्रिटच्या जंगलात अशी वखवख ठायीठायी आढळते. सुमारे एकच्या सुमारास गाडी एका नियोजित ठिकाणी थांबली. तिथे बाथरुम होते, झाडांच्या सावलीखाली काही बाकडी होती. प्रवाशांच्या उसंतीसाठी हा थांबा तयार केलेला होता. पर्यटकांनी पाय मोकळे केले. त्यावेळात ड्रायव्हर व त्याच्या मदतनीसाने बाकड्यांवर बरोबर आणलेले खाद्यपदार्थ मांडले. पिण्याचे पाणी दिले. बॉक्समधील खाणे दर्जेदार व भरपूर होते. सभोवतालचे दृष्य न्याहाळत जेवण केले. ड्रायव्हरशी गप्पाटप्पा झाल्या. सर्व कचरा एका पिशवीत घेऊन अर्ध्या तासात पुढील भाग बघण्यासाठी निघालो. ड्रायव्हरला जंगलाची खडान्खडा माहिति होती. शिवाय वॉकीटॉकीवरून इतर ड्रायव्हर प्राण्यांच्या ठावठिकाण्याची माहीती देत होते. एका पाणवठ्यावर खूप पाणघोडे आढळले. पुढे गेल्यावर अखेर जंगलाच्या राजाचे दर्शन झाले. सुस्तावलेले सिंहराज पाच-सहा पट्टराण्यांसमवेत सावलीत निवांत पहुडले होते. सिंहिणी आपापल्या बछड्यांशी खेळत होत्या. कौटुंबिक चित्रपटात शोभावे असे ते दृश्य होते. 'बीग फाईव्ह' म्हणजे जंगलातील पाच मोठी महत्त्वाची जनावरे- सिंह, हत्ती, रानम्हैस, बिबट्या व गेंडा. यापैकी बिबट्या व गेंडा यांचे दर्शन बाकी राहिलेले होते. बिबट्या मुख्यत्वे झाडावर राहातो. ड्रायव्हरने एका झाडाकडे मोर्चा वळवला व सर्वांना गप्प राहण्यास सांगितले. झाडापासून काही अंतरावर गाडी बंद करून थांबली. त्या झाडावर बिबट्या एका हरणाला मारून खात होता. कमकुवत ह्रदयाच्या लोकांना कदाचित हे दृश्य पचणारे नव्हते. मात्र जंगलाचा अनुभव घेणाऱ्यांना ही एक खास पर्वणी होती. बिबट्या हरणाच्या मृत अवशेषांवर तल्लीन होऊन ताव मारत होता. दूरवर काही लांडगे व कोल्हे काही भाग खाली पडतो का या आशेने उभे होते. आम्ही मनसोक्त फोटो घेतले. व्हिडीओ शूटींग केले. दुर्बिणीतून हे दृश्य अजूनच स्पष्ट दिसत होते. मात्र तिथून अजून काही प्राणी बघत ड्रायव्हर चित्त्याच्या मागावर निघाला. ड्रायव्हर खूपच हुषार होता. एकेठिकाणी गाडी थांबवून त्याने दूरवर दगडावर बसलेल्या चित्त्याचे दर्शन घडवले. जमिनीवरून धावणारा सर्वात जलद प्राणी तो हाच. दुर्बिणीतून त्याच्या छोट्या डोक्याच्या दोन डोळ्यांतून अश्रूप्रमाणे भासणारे पट्टे स्पष्टपणे पाहिले. भूक लागल्याशिवाय कुणीही उगीचच शिकार करताना आढळत नव्हते. हत्तींचे काही कळप झाडाखाली सावलीत उभे होते. सारे कसे स्वप्नवत भासत होते. पाचच्या सुमारास सूर्य कलू लागल्याचे जाणवू लागले. सावल्या लांबू लागल्या. नियमानुसार सूर्यास्ताच्या आत घाटमाथ्यावर परतणे भाग होते. वाटेत बबून माकाडांचा जथ्था लागला. या काही प्राण्यांना पर्यटकांची सवय झाली असावी. कुणीही गाड्यांना घाबरत नव्हते.

गाडी घाटमाथ्यावर आली. एका पठारावर तंबू उभारण्यात आलेले होते. अनेक सफारींच्या गाड्या तिथे

उभ्या होत्या. काहींचा प्रवास झालेला होता तर काही उद्या विवरात उतरणार होते. तंबूक्षेत्रापासून जवळच बाथरुमची व्यवस्था होती. एका भल्यामोठ्या उघड्या हॉलमध्ये अनेक टेबल-खुर्च्या मांडलेल्या होत्या. तर एका हॉलमध्ये बरीच स्वैपाकघरं होती. प्रत्येक कंपनीचा आचारी आता स्वैपाकाच्या तयारीला लागलेला होता. बरोबर आणलेले सामान खुबीने वापरून पर्यटकांना भरपेट जेवण देणे ही त्याची कला होती. प्रत्येकाला तंबू दिला. त्यात स्लिपिंग बॅगा, पांघरूण व उशा ठेवलेल्या होत्या. आपापली बॅग घेऊन प्रत्येकजण तंबूत गेला. मी कपडे बदलले. त्या आधी हातपाय तोंड स्वच्छ धुतले. थोडे पाय मोकळे केले. तिन्हीसांज होऊ लागली होती. वरून खालचे विवर दिसत होते. त्यातील प्राणी आता विश्रांती घेत असतील




**सेरेंगीटी अभयारण्याचे प्रवेशद्वार**

तर काही रात्री शिकार करण्याचे मनसुबे आखत असतील या विचारात मीही भटकत होतो. जगभरातून विविध देशांतून पर्यटक आलेले होते.

तेवढ्यात पाठीमागून हिंदीतील वाक्ये कानावर आली. सुमारे आठ-दहा आपल्या देशातील मंडळी हास्यविनोदात रमलेली दिसली. हिंदीत बोलणारे भेटले हे पाहून मलाही बरे वाटले. मात्र आपल्याप्रमाणे त्यांना कितपत आनंद होईल, याची खात्री नव्हती. आमच्या पर्यटक कंपनीने दिलेला चहा पीतपीत मी त्या गँगजवळ गेलो. वाटलं असतील दिल्ली, मुंबईकडचे. त्यांचं हिंदी खूपच चांगलं असल्याने युपी-बिहारकडचे असावेत, असा कयास बांधला. मी त्यांच्याकडे येतोय हे पाहून अदबीने त्यांनी त्यांच्या बाकड्यावर जागा करून दिली. नमस्कार-चमत्कार झाले. तेव्हा समजले की, ते पाकिस्तानी डॉक्टर्स आहेत. युगांडाहून ते फिरून जंगलसफारीसाठी आले आहेत. संयुक्त राष्ट्र संघातर्फे (UNO) ते सुदानमध्ये वर्षभर एक मोहीम राबवित आहेत. त्यांच्यात दोन महिला डॉक्टरही होत्या. त्यांनी स्वतः मोठी व्हॅनवजा बस भाड्याने घेऊन गाईड व खानसामा बरोबर घेतला होता. सर्वजण खूप उत्साही, आनंदित वाटत होते. माझे स्वतःचे पाकिस्तानी मंडळींशी खूप पटते. मियामीपासून त्यांच्या आदरातिथ्यावर, भाषेवर, मनमोकळ्या गप्पांवर मी जाम फिदा आहे. अद्यापी मला एकही भारतद्वेषी पाकिस्तानी भेटलेला नाही. ही मंडळीही अपवाद नव्हती. मी भारतीय शिवाय किलीमांजारो करून आलो यामुळे मला अधिक सन्मानाने वागवत होते. त्यांच्याकडील खासपदार्थ, चहा-कॉफी देऊ करून गप्पा मारत होते. मी बोलघेवडा. मीही खूप गप्पा मारल्या. माझ्या स्वभावावर मंडळी बेहद्द खूष होती. मग गप्पा नेहमीप्रमाणेच भारत पाकिस्तान संबंधांवर येऊन ठेपल्या. ''जनाब, हमारे लिऐ हिंदुस्थान तो बडा भाई है! मैं तो कहता हूँ, काश्मिर क्या, पूरा पाकिस्तान देने के लिए हम तैयार हैं!'' एक डॉक्टर तळमळीने बोलला. ''ये सब पॉलिटिशन्स का खेल है जो इन दोनो मुलकों को एकदुसरे से लढवाता है! वरना हमे भी हिंदुस्तान की तरह आगे बढना है!'' सर्वांच्या बोलण्यातील खरेपणा जाणवत नव्हे तर भिडत होता. ''चलो क्रिकेट खेलते हैं'' मी गमतीने म्हणालो. हिंदी सिनेमा, क्रिकेट, खाणंपिणं या गोष्टी दोन्ही देशांना अजूनही जखडून ठेवतात. जमिनीवर रेष मारल्याने संस्कृती विभागली जाऊ शकत नाही. मात्र भाषेतील मिठास, वागण्यातील अदब यात पाकिस्तानी दोन पावलं पुढे आहेत हे मोठ्या मनाने मी मान्य करायला तयार आहे. क्रिकेटचा डावही रंगला असता परंतु आता अंधार झाला. आपापल्या ग्रुपमध्ये जाणे भाग होते. राहणीमानानुसार अन्न बनवलेले होते. मी आमच्या टेबलावर आलो. सूप, नुडल्स् वगैरे बरोबर काही भाज्या, ब्रेड वगैरे जेवणासाठी होते. नुकतेच मित्र झालेले पाकिस्तानी माझ्या टेबलाजवळ आले आणि आग्रहाने मला त्यांच्या टेबलावर घेऊन गेले. तिथे मधोमध बसवले. समोरील बिर्याणीचा वास नाकात जाऊन हैराण करत होता. आज सोमवार असल्याने नाइलाज झाला. मी तसे त्यांना सांगितले. त्यांनी माझा मान ठेवला. म्हणाले, ''भाईसाब चाहे तो पैक करके दे दूं?'' मी म्हटले, ''पैक करना है तो थोडी मुहब्बत पॅक कर दो!'' या वाक्यावर साऱ्यांनी टाळ्या वाजवल्या. नजर एकवार त्या देखण्या पाकिस्तानी डॉक्टरणींवर टाकली, त्या शरमेने लाल झाल्या. मग सारेजण अजून खूष झाले. पुढील जंगलसफारी मी त्यांच्याबरोबर करावी अशी त्यांनी गळ घातली. मात्र मी नम्रपणे त्याचा स्वीकार केला व म्हणालो, ''अगर मौका मिला तो दोतीन दिन क्या जादा दिनके लिए पाकिस्तान आएंगे और आपको खिदमत का मौका देंगे.'' जेवणानंतर सर्वजण आपापल्या तंबूत गेले. मात्र पाकिस्तानी पर्यटकांच्या एका मोठ्या तंबूत शेरोशायरी व गाण्यांचा कार्यक्रम ठरला होता. मला आग्रहाचे निमंत्रण आले, त्यांचे तर म्हणणे होते की, मी त्यांच्याबरोबर ती रात्र राहावे. सुमारे तासभर त्यांच्या मैफिलीत रमलो. मीही थोडा घसा साफ करून घेतला. एकदोन शेर ऐकवले. डॉक्टर असूनही त्यांची कलेची बाजूही बळकट होती. रात्री परत माझ्या तंबूत आलो. जंगलातल्या प्राण्यांना आळवत भारत-

पाकिस्तान एक होताहेत. असे स्वप्न बघत निद्रादेवीच्या स्वाधीन झालो.

तांबडं फुटलं. गार पाण्याने आंघोळ केली. पटपट आवरून बॅग तयार केली. स्वयंपाक्याने चहा-कॉफी तयार असल्याचे सांगितले. चहा-बिस्किटे झाल्यावर ब्रेड-ऑमलेटचा नाश्ता झाला. पर्यटकांची लगबग वाढली. आता सर्वजण लवकर आवरून पुढील कार्यक्रमाला निघायला उत्सुक झालेले होते. आमची गाडी तयार झाली. तेवढ्यात पाकिस्तानी डॉक्टर्सचा तो ग्रुप माझ्याकडे आला. मग फोटो काढले. पुढे वाटेत भेटलो तर गप्पा होतील आणि नाही झाली तर ओळख विसरू नका, अशा वाक्यांची देवाणघेवाण झाली. सर्वांनी माझ्याशी हस्तांदोलन केले व मिठी मारली. मी कोण कुठला काही तास भेटलेला. ना देणं, ना घेणं. कदाचित भारत व पाकिस्तान यांच्यामधील सामान्य जनतेचा असलेला हा आंतरिक जिव्हाळा असावा, हे दोन्ही देश असेच एकत्र झाले तर खूप मोठी महासत्ता उदयास येऊ शकेल नाही, का!

नोरेंगेरोचा निरोप घेतला. पुढचा मुक्काम 'सरेंगीटी राष्ट्रीय उद्यान.' जगातील सर्वांत मोठ्या अभयारण्यांपैकी एक. सुमारे दोन तासांच्या प्रवासानंतर गाडी एका प्रवेशद्वारापाशी येऊन थांबली. 'सरेंगीटी अभयाराण्या'ची ही हद्द. पर्यटकांच्या गाड्या इथं थांबतात. याकारणास्तव चार पैसे मिळतील या आशेने काही मसाई, लहान मुले तिथे उभे राहून वस्तूंची विक्री करताना आढळले. ते पाहून पोटात खड्डा पडला. कारण नजर जाईल तिथपर्यंत अमर्याद सपाट भूप्रदेश दिसत होतात. त्यावर वाढलेले कुरण. त्यात लपलेली रानटी जनावरे. अशा जोखीमग्रस्त भागातून येणे किती भीतिदायक. टांझानीयातील 'सरेंगीटी' व केनियातील 'मसाई मारा' या प्रदेशातून लाखो प्राण्यांचे वर्षभर संक्रमण होत असते. जगातील हे सर्वांत मोठे संक्रमण समजले जाते. ''मारा'' व ''किराबारा'' नद्यांना ओलंडून लाखो प्राणी विशेषतः तृणजीवी 'जंगली बीस्त' या दोन्ही अभयरण्यातून भटकत असतात. सरेंगीटी हे दक्षिणेला तर मसाईमारा हे उत्तरेला आहे. ऑक्टोबरमध्ये दक्षिणेकडे तर एप्रिलमध्ये उत्तरेकडे असे वर्तुळाकार संक्रमण होत असते. हे दृष्य बघण्यासारखं असतं. मी ऑगस्ट/सप्टेंबरमध्ये तिथे असल्याने या संक्रमणास मुकलो. काही वेळात गाडी एका ओढ्याजवळ थांबली. इथे सरेंगीटीचे चेकपोस्ट आहे. प्राण्यांची तस्करी रोखणे, अवैध कृत्यांना आळा घालणे हे यांचे काम. इथे लहानसे दुकान होते. ड्रायव्हरने प्रवेशशुल्क भरले. तिथल्या लहानशा टेकडीवर गेलो. सभोवताल बघण्यासारखा होता. क्षितिजापर्यंत गवताची फक्त कुरणे पसरली होती. त्यामुळे हरणांना खायला मुबलक खाद्य होते. निसर्गाची किमया म्हणजे समतोल राखण्यासाठी या तृणजीवी प्राण्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे क्रमप्रात असते नाही का? मग त्यांना भक्ष्य बनवणारे प्राणी आले. खुरट्या पण उंच झाडांचा पाला खाता यावा म्हणून घोड्यांमध्ये बदल होऊन जिराफ निर्माण झाला. विस्तीर्ण अशा या भागात जंगली प्राण्यांची रेलचेल होती. वाघ, सिंह, हरणं, चित्ता, बिबट्या, वाईल्ड बीस्ट वगैरे ठासून भरलेले होते. पावसामुळे साचलेल्या पाण्यांचे पाणवठे हे जनावरांचं क्षुधा संपवणारे साधन होते. मैलोनमैल कुठलाही लोकवस्तीचा मागमूस नव्हता. मोठी झाडे खूपच तुरळक दिसून येत होती. इथे एक छोटेखानी वस्तुसंग्रहालय उभारण्यात आलेले आहे. इथला इतिहास-भूगोल, जडणघडण कशी झाली, याची सविस्तर माहिती ठेवलेली आहे. हे सांगणारा मार्गदर्शक खास मसाई जमातींचा युवक आहे. अस्खलित इंग्लिशमध्ये त्याने मनःपूर्वक सगळी माहिती दिली. ड्रायव्हरने कित्येक मैल गाडी चालवली. हे पसरलेले



**वस्तुसंग्रहालयात अस्खलितपणे इंग्रजीमध्ये माहिती देणारा मसाई**

अभयारण्य असल्याने नोरोंगेरोप्रमाणे खूप प्रमाणात प्राणी दिसून येत नव्हते. तरीही सिंह, पाणघोडे, रानम्हशी, वाईल्ड बीस्ट, रानडुक्कर, विविध हरणे वगैरे दिसले. सुमारे साडेचारच्या सुमारास गाडी कॅम्पिंगच्या ठिकाणी आली. एका संरक्षित क्षेत्राच्या आत लहानसहान तंबू जागोजाग उभारले होते. एका बाजूला स्वैपाक व एकत्र बसून जेवणाचे हॉल्स् व दुसऱ्या बाजूला स्नानगृहे व बाथरुम्स्. माझ्या तंबूत बॅग ठेवली. हात-पाय तोंड धुतले. चहापाणी झाले. मग सहाच्या सुमारास पुनः 'गेमिंग साठी' निघालो. पूर्वीच्या काळी 'गेमिंग' म्हणजे शिकार. आता शिकारीवर कायद्याने बंदी आहे. तेव्हा 'गेमिंग' म्हणजे अनुभव साठविणे. प्रत्यक्ष बघून, फोटो काढून, व्हिडीओग्राफी करून वगैरे. दीडएक तास भटकून संध्याकाळी होणाऱ्या प्राण्यांच्या हालचाली टिपणे हा त्यामागचा उद्देश होता. कित्येकदा दुपारच्या तळपत्या उन्हात काही प्राणी विश्रांती घेतात. रानम्हशींचे तांडे बघितले, जिराफ, हरणे पाहिली. प्राणी एवढे विपुल होते की, काही काळाने तर हरणं, रानम्हशी, रानडुक्कर, हत्ती, झेब्रा वगैरे पाहून कुणीही गाडी थांबवण्याचा आग्रह करत नव्हते. सिंह, बिबट्या, चित्ता, पाणघोडे वगैरे अधिक दुर्मीळ प्राणी बघण्याचे वेध लागले होते.

आता सूर्य कलला होता. काही वेळांनी सूर्यास्त होणार

होता. तेवढ्यात दूरवर सिंहीण दिसली. म्हणून तिकडे गाडी वळवण्यात आली. सुमारे शंभर मीटर अंतरावर सिंहीण एका उंचवट्यावर बसली होती. दूरवर तिची पिल्ले खेळत होती. वारा निःशब्द होता. नेहमीप्रमाणे गाडी बंद करण्यात आली. फोटो काढणे, मनसोक्त बघता यावे म्हणून ड्रायव्हरही निवांत झाला. गाडीतील पर्यटकांनी त्या सिंहीणीचे मनसोक्त दर्शन घेतले. फोटो काढले. वरचा टप उघडला गेला. गाडी एका खड्ड्यात होती व पुढे किंचित चढण होती. सर्वांचे समाधान झाल्यावर ड्रायव्हरने गाडी सुरू करण्यासाठी गाडीची किल्ली फिरवली. परंतु 'घूरघूर' आवाज करून गाडी गप्प झाली. ड्रायव्हरने असे बऱ्याचवेळा केले. गाडी सुरूच होईना. शिवाय गाडी बंद पडल्यावर वरचे छप्परही बंद करता येत नव्हते. ड्रायव्हरने



**वाईल्ड बीस्ट**

खूप प्रयत्न केला. परंतु गाडी रुसलेल्या वरमाईप्रमाणे फुरंगटून बसलेली होती. सुमारे पाच-दहा मिनिटे हा खटाटोप चालू होता. ड्रायव्हरच्या चेहऱ्यावरचा घाम वाढलेला मी नजरेने टिपला. सेरेंगीटीचे ते विस्तीर्ण कुरण भयंकर भासू लागले. आपण आता पार अडकलो या विचाराने सारे घाबरले. कित्येक मैल पसरलेल्या या अभयारण्यात मदत पोहोचायला देखील काही तास जाऊ शकतात. आमची ही स्थिती समोरील सिंहीणीने ओळखली. ती गुरगुर करू लागली. उभी राहिली. तिची शेपटी ताठ झाली. तिच्या चेहऱ्यावरील सौम्य भाव जाऊन उग्र भाव येऊ लागले. ड्रायव्हर किल्ली फिरवून थकला. त्याचे असे झाले होते की, पर्यटकांना कॅमेरा, व्हिडीओकॅमेरा, फोन वगैरे चार्ज करता येऊ शकेल यासाठी काही सोयी दिलेल्या होत्या. मात्र त्या वापरण्याआधी ड्रायव्हरला तसे सांगणे जरुरीचे असते. म्हणजे तो गाडीच्या बॅटरीऐवजी दुसरीकडून विजेचा पुरवठा करू शकतो. विशेषतः गाडी बंद असताना कुणीही चार्जरशी खेळू नये. आमच्यातील एका अतिहुषार सद्गृहस्थाने गाडी बंद असताना त्याचा व्हिडिओकॅमेरा चार्जिंगला ठेवला होता. त्यामुळे गाडीची बॅटरी जवळजवळ संपली होती. सर्वजण चिंतेत होते. शेवटी मी ड्रायव्हरला म्हणालो फक्त एकदाच आता किल्ली फिरवा. तो किल्ली फिरवत असतानाच मी जोरात ओरडलो 'गणपती बाप्पा मोरया' आणि काय आश्चर्य गाडी सुरू झाली. अशारितीने आम्हाला गणराया पावला. ड्रायव्हरने मग क्षणाचाही विलंब न लावता गाडी सुसाट परत कॅंपसाईटकडे हाकली. सिंहीण परत तिच्या जागेवर बसली.

कॅंपसाईटवर आलो तेव्हा सूर्यास्त होऊन गेला होता. संधिप्रकाशात भटारखाने लावलेले होते. साडेसातच्या सुमारास भरपेट जेवणं झाली. मी काही इतर पर्यटकांबरोबर गप्पा मारल्या. सफारीला येणारे प्रवासी हे किलीमांजारोला येणाऱ्या ट्रेनर्सपेक्षा वेगळे आढळले.

रात्री स्वयंपाकघरातील आवराआवर संपल्यानंतर नीरव शांतता पसरली. त्या चौकोनी तीन-चार एकराच्या कॅंपसाईटच्या पलीकडे वेगळेच विश्व नांदत होते. आमची रात्र झाली होती तर त्यांचा दिवस सुरू झाला होता. मी बाथरुमला जाताना सहज आकाशाकडे बघितले. एवढ्या तारका कधीच बघितल्या नव्हत्या. आकाश नक्षत्रांनी, ताऱ्यांनी, ग्रहांनी लख्ख भरलेले होते. मी स्तब्ध होऊन ते न्याहाळत उभा राहिलो. मग माझ्या तंबूच्या बाहेरच उभा राहून ती नीरव शांतता मनामध्ये साठवू लागलो. कुंपणाच्या पलीकडे होणारे प्राण्यांचे आवाज स्पष्टपणे ऐकू येत होते. रानम्हैस, रानडुक्कर, तरस, कदाचित सिंहही. दबलेले आवाज, पंजांची खरवड स्पष्टपणे ऐकली. संपूर्ण सफारीतील हा एक विलक्षण अनुभव.

पहाटे लवकर उठायचे ठरले होते. सेरेंगीटीतून सूर्योदय पहायचा होता. चहापाणी उरकले. गाड्यांमध्ये सामान टाकले. परदेशी पर्यटक चटपटीत असतात. कॅंपसाईटचा निरोप घेऊन निघालो. नजर पोहोचणार नाही इतक्या दूर क्षितिज होते. गाडी जणू क्षितिजाचा वेध घेत निघाली होती. तांबूस आकाश हळूहळू गडद तांबडे होऊ लागले. नजर तिथेच खिळली होती. कॅमेरे व व्हिडिओ कॅमेरे तयार ठेवले होते. आणि त्या गडद तांबड्या कापडातून बारीक तेजस्वी बिंदू बाहेर आला. आणि बघता बघता त्या बिंदूचे तांबड्या गोळ्यात रूपांतर कधी झाले काही कळलेच नाही. विधात्याने पृथ्वीला एक सुंदर दिवस असा बक्षिशीत दिला. मी त्याचे मनोमन आभार मानले. रोजचा दिवस असाच सुरू होतो. परंतु आपल्याला सेरेंगीटीसारख्या जगप्रसिद्ध अभयारण्यात दिवसाची अशी सुरुवात करायला मिळाली यातच मी भाग्य मानतो. हळूहळू आकशाची सारी सूत्रे हातात घेऊन सूर्यनारायणाने हजारो किरणे चहू दिशांना फेकली आणि अंधारात बुडलेले ते रान पुनः उजळून निघाले. प्राण्यांची लगबग सुरू झाली. पाणवठ्यावर रानम्हशी आल्या. त्यातील मगरी लाकडी ओंडक्यांप्रमाणे आ वासून भक्ष्याची वाट बघू लागल्या. त्यांच्या पाठीवरील पक्षी किडेमुंगी खाण्यात मग्न होते. गाडी आता एका वळणावर येऊन थांबली. तिथे काही गाड्या आधीपासूनच

उभ्या होत्या. समोर काही सिंह, सिंहिणी व पिल्ले बसलेली होती. जंगलचा राजा खरोखरच शोभत होता. तेवढ्यात बाजूने काही हत्तींची पलटण आली. ते सिंहाच्या भागातून जात होते. त्यांचा म्होरक्या जसा सिंहाच्या भागात आला तसा हा जंगलचा राजा नेहमीची आळशीपणाची झूल उतरवून लढवय्याप्रमाणे चाल करून गेला. हत्ती मागे आला नाही. सिंहाने लढाईचा पवित्रा घेत गुरगुर केली. हत्तीने सोंड फिरवली व सिंहाला चुचकारण्याचा प्रयत्न केला. सिंह घाबरला नाही. तो अजून दोन पावले चाल करून गेला. ते पाहून हत्ती मागे हलला. सिंहाने अजून चाल केली हे पाहून हत्ती माघारी वळला. तो आणि त्याची गँग दुसऱ्या बाजूने चालते झाले. अशारितीने जंगलचा राजा कोण हे सिंहाने दाखवून दिले. हे सर्व बघताना खूप धन्य झाल्यासारखे वाटले. त्यानंतर सेरेंगीटीत अनेक मैल भटकलो. रस्त्यातून सळसळत जाणारा साप बघितला. तसे या भागात साप विशेष नाहीत. उघड्या गाडीतून जात असल्याने धुळीचा त्रास होत होता. त्यामुळे तोंडाभोवती, पुण्यातील दुचाकी स्वार मुली बांधतात तसे फडके लावावे लागले. रस्त्यावरून कित्येक जनावरे आडवी जाताना दिसली. ड्रायव्हर लोकांना आपल्या संस्कृतीविषयी, पर्यावरणाविषयी प्रचंड अभिमान व जाण आढळली. नोरोंगोरोप्रमाणे एकेठिकाणी दुपारच्या जेवणासाठी थांबलो. तिथे बाथरुमची सोय होती. बाकड्यांवर बसून जेवण केले. ड्रायव्हरने चित्ता, झाडावरील बिबळ्या, एकांड्या शिलेदाराप्रमाणे चालणारा हत्ती, रानगायी दाखवल्या. या लोकांना अनुभवामुळे कुठले प्राणी कधी आणि कुठे असू शकतील याचे ज्ञान असते. सुमारे तीनच्या सुमारास परतीच्या प्रवासास लागलो. वाटेत मसाई लोकांचे गाव दृष्टीस पडले. काही गावांमध्ये पर्यटकांना प्रवेश दिला जातो तर काहींमध्ये प्रवेशास मनाई असते. निसर्गाशी मिळतेजुळते घेऊन राहणाऱ्या मसाईंचे खूप कौतुक वाटले. गाडी नोरोंगोरोच्या काठाकाठाने लोकवस्तीकडे प्रवास करू लागली. तुरळक गावे लागली. वाटेत एका दुकानाजवळ थांबलो. आपल्याकडे जसे दुकानदाराकडून कमिशन घेऊन गाडी थांबवली जाते ना तसाच हा काहीसा प्रकार. तिथे चहापाणी झाले. काही कलाकुसरींच्या गोष्टी विकावयास होत्या. सुमारे सहाच्या सुमारास 'फनाका' या मुक्कामाच्या ठिकाणी आलो. अरुषावरून निघून याच रिसॉर्टमध्ये चहापाण्यासाठी थांबलो होतो. मला चांगली खोली मिळाली. मनसोक्त आंघोळ केली. मच्छरदाणीची गरज नसून बहुधा इथल्या प्रथेनुसार ती गादीभोवती लावली होती. फोन, कॅमेरा, व्हिडीओ कॅमेरा पटापट चार्जिंगला लावले. पूर्वीच्याकाळी रहात असताना जसे पाणी आल्यावर बादल्या, घागरी, तांबे, कळशा भरून ठेवतो ना तसेच अगदी सर्व इलेक्ट्रॉनिक्स संधी मिळेल तसे चार्ज करून ठेवत असे. रात्री सुरेखपणे भरपेट जेवण केले. रिसॉर्ट एकदम स्वच्छ व टापटीप होते. उद्या 'टेरेंगीरी' मग तसेच परस्पर अरुषामार्गे 'किलीमांजारो' एअरपोर्टला जाणार होतो.

आफ्रिकेतली ही शेवटची रात्र. अनेक सुंदर आठवणी. रोमांचकारी अद्भुत, साहसी अनुभव गाठीशी बांधून जाणार होतो. किलीमांजारो जंगल त्याचबरोबर इथली माणसे, संस्कृती अशा अनेक आठवणी मनाच्या कप्प्यात जतन करून ठेवणार होतो.

सकाळी 'फनाका'त व्यवस्थित नाश्तापाणी केले. कॉफी, चहा, कोको, अंडी, फळे, ब्रेड, ओट्स, केक वगैरे नेहमीप्रमाणे खाणे झाले. आता वेगळी गाडी होती. प्रवासीही वेगळे होते. लोकांनी ज्याप्रमाणे कार्यक्रम ठरवला असतो त्याप्रमाणे गाडी भरतात. इथून ''मनयारा तलाव'' व ''टेरेंगीरी राष्ट्रीय उद्यान'' अशी दोन ठिकाणे सारख्या अंतरावर आहेत. ''मनयारा'' हे उद्यान खास करून पक्षांसाठी व जलचरांसाठी प्रसिद्ध असून टेरेंगीरी हे मोठ्या प्राण्यांसाठी प्रसिद्ध आहे. सुमारे तासाभरात गाडी मुख्य रस्ता सोडून नसरापूर फाट्यासारख्या गावातून आत शिरली. सुमारे ५ कि.मी. अंतरावर उद्यानाची सीमा सुरू झाली. थोड्याच वेळात प्रवेशद्वार लागले. तिथे गाडी काही वेळ थांबवण्यात आली. लहानसे म्युझियम होते. आजूबाजूच्या परिसराची माहिती मांडलेली होती. टेरेंगीरी नदीच्या दोन्ही काठांवर हे अरण्य असून ते 'बॅबॉक' वृक्षांसाठी प्रसिद्ध आहे. असं म्हणतात की, पुराणकाळात बॅबॉक वृक्षाने देवाचा रोष पत्करला. त्याला देवाने शाप देऊन पृथ्वीवर फेकून दिले. मात्र उलट्या स्थितीत ते पृथ्वीवर आदळले. तेव्हापासून हे महाकाय झाड जाणू उलट्या स्थितीत आढळते. जणू याची मुळे वर व खोड व फांद्या खाली असा त्याचा अवतार असतो. हे झाड शेकडो वर्षांपर्यंत जगते. काहीतर हजार एक वर्षसुद्धा जगल्याचे पुरावे आहेत. वडाप्रमाणे दिसणारे हे झाड स्थानिक लोकं जिवापाड जपतात. रानटी जमाती याची पूजा करतात. याला दोऱ्या बांधून एक दिवस पाळतात. किती अजब गोष्ट आहे नाही? भारतात वटसावित्रीच्या दिवशीदेखील आपण वडाची अशीच पूजा करतो नाही का? अशा रुढीपरंपरा



**टेरेंगीरी राष्ट्रीय अभयारण्यातील बॅबॉक वृक्ष**

निसर्गातील समतोल राखतात. पूर्वीच्या या परंपरा जपण्यातच मानवजातीचे हित आहे असे मला वाटते.

प्रवेशाजवळील बॅबॉक वृक्षावर शिड्यावगैरे लावून एक मोठे माचण वजा टेहळणीची जागा केली आहे. जवळच हत्तींचा कळप मुक्तपणे वावरताना पाहून आश्चर्य वाटले. थोड्यावेळाने गाडी आखलेल्या कच्च्या रस्त्यावरून निघाली. नोरोंगोरो, सरेंगीटीच्या तुलनेने हे उद्यान लहान आहे. प्राणी बरेचसे तेच आहेत. गेले तीन दिवस प्राणी बघितल्याने नाविन्यच उरलेले नव्हते. मात्र, तरीही खऱ्याखुऱ्या आणि तेही आफ्रिकेतील हे वैभव बघताना थक्क होत होतो. सिंह, सिंहिणींचा खूप मोठा कळप लागला. रानम्हशी झुंडीने फिरत होत्या. हे उद्यान हत्तींसाठी प्रसिद्ध आहे. कधीही बघितले नाहीत एवढे हत्ती एकाठिकाणी



**टेरेंगीरी अभयारण्यातील हत्तींचे कळप**

पाहिले. झेब्रांचा कळप भटकत होता. उद्यानाच्या माथ्यावर प्रवाशांच्या सोयीसाठी एक थांबा उभारला होता. स्वच्छ बाथरुम, पिकनीक टेबल मुबलक प्रमाणात होते. इथे जेवणासाठी थांबलो. नेहमीच्या पद्धतीचे 'पॅक्डलंच' दिले. या ठिकाणावरून टेरेंगीरी नदी खाली वाहताना दिसत होती. आम्ही काहीसे उंचावर होतो. नदीभोवती खूप प्राणी दिसून येत होते. झेब्रा, जिराफ, हत्ती वगैरे. या अरुषा मोठ्या गावाजवळ असल्याने स्थानिक प्रवासी बऱ्यापैकी प्रमाणात दिसून येत होते. दुपारचे भोजन झाल्यावर परत उरलेला भाग बघण्यासाठी निघालो. गाडी खाचखळग्यांतून जात होती. एका ठिकाणी नदीचे पाणी कमी होते. त्यातून ड्रायव्हरने गाडी कुशलतेने काढली. एकेठिकाणी थांबलो. दूरवर जेवणासाठी थांबलो होतो ती जागा वर दिसत होती. नदीभोवती झेब्रांचे जथेच्या जथे विहार करत होते. जिराफ मान वर करून झाडांची पाने खात होता. ते पाहून लहानपणीच्या टॉनिकच्या जाहिरातीची आठवण झाली. ऊन रणरणत होते. झाडे बऱ्यापैकी होती परंतु खुरटी झाडेही खूप होती. गाडी हळूहळू उद्यानाच्या दुसऱ्या टोकाला आली. आता लवकरच ती वळून परतीच्या मार्गावर निघणार होती. हा प्रवास संपू नये असे वाटत होते. उद्यापासून या सगळ्याला मुकणार होतो. पुनः काँक्रिटचे जंगल, वाहनांचा गदारोळ, मनुष्यजातीतील हिंस्त्रपणा अनुभवणार होतो. या विचारात असताना ड्रायव्हरने गाडीच्या काचा बंद करण्याची सूचना दिली. किंबहुना तो थोडा हवालदिल झालेला आढळला. त्याचे कारण लवकरच समजले. समोर माशांचा थवा होता. घोंघावणाऱ्या या काहीशा मोठ्या माशा भयानक दिसत होत्या. झटपट हालचाली करून देखील काही माशा गाडीत घुसल्या. ड्रायव्हर घाबरल्यासारखा दिसत होता. तेव्हा समजले की याच त्या कुप्रसिद्ध 'त्सेत्से' माशा. ॲमेझॉनच्या नदीत ज्याप्रमाणे जीवघेणे 'पिरान्हा' मासे असतात तसे आफ्रिकेच्या जंगलातील विषारी 'त्सेत्से' माशी. ही चावली असता माणसाला अर्धांगवायूचा झटका येऊ शकतो, काही वेळेस तात्काळ मृत्यूही संभवू शकतो. आता समजले की या उद्यानात ठिकठिकाणी त्सेत्से माशी विरोधक जाळ्या व चित्रे का लावण्यात आलेली आहेत. एवढ्यात जे नको व्हायला हवे होते तेच घडले. मला एक त्सेत्से माशी चावली. सकाळी गडबडीत अंगाला औषधी क्रिम लावायचे राहून गेले होते. क्षणभर हात बधीर झाला. मी ड्रायव्हरला माशी चावली हे सांगितले. तो खूपच घाबरला. बघतो तर काय. मला चावल्यावर ती माशी बाजूला मरून पडलेली होती. त्याही स्थितीत मी तिला एका झिपलॉकच्या प्लॅस्टिक पिशवीत ठेवले. मला घाबरू नको असे ड्रायव्हर जरी सांगत असला तरीही तोच जास्ती घाबरला असावा.

आज रात्री मोशीला जाऊन सामान घेऊन मध्यरात्री किलीमांजारो विमानतळावरून उडायचे होते. दुपार टळत असताना हे जीव घेणे संकट दत्त म्हणून उभे राहिले. टेरेंगिरी उद्यानातून बाहेर पडण्याचा प्रवास सुरू झाला होता. मात्र आपल्या डोक्यावर जीवनमरणाची टांगणी तलवार उभी होती. अगदी शेवटीशेवटी असा प्रसंग आलेला पाहून धक्का बसला. तासभर तसाच गेला. ड्रायव्हरने माझ्याकडे पाहिले. माशी जिथे चावली, तो भाग पाहिला. तो भाग सुजला होता. लालबुंद झाला होता. मात्र बाकी मी ठीक होतो. त्याला हर्षवायू झाला. तो म्हणाला, हा फार मोठा चमत्कार आहे. तू वाचलास. माझाही जीव भांड्यात पडला. सहप्रवाशांनी टाळ्या वाजवल्या. 'त्सेत्से' माशीचे विष एकतर लगेच प्रभाव दाखवते अन्यथा नाही. कदाचित मुळामुठेच्या पाण्याने माझे शरीर तयार झाले असावे आणि बिचारी त्सेत्से माशी आपला जीव गमावून बसली. ती मेलेली माशी मी बरोबर ठेवली. सुमारे चारच्या आसपास उद्यानाच्या प्रवेशद्वारापाशी आलो. आता परतीचे वेध लागले होते. तासाभरात फनाका, तिथून अरुषा मार्गे मोशी मग किलीमांजारो विमानतळ अशी कसरत करावी लागणार होती. प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. विमानाची वेळ टाळून चालणार नव्हती.

पाच वाजता फनाकात आलो. चहापाणी झाले. मात्र माझे चित्त थाऱ्यावर नव्हते. ''शीटं'' भरून गाडी हलणार होती. मात्र एक प्रवासी नोरोंगोरोतून आलेला नव्हता.

सुमारे अर्धापाऊण तास ताटकळलो. माझा जीव टांगणीला लागलेला होता. घड्याळ्याच्या काट्यावर सारे अवलंबून होते. साडेसहाला गाडी कशीबशी हलली. अरुषात साडेसातला पोहोचलो. इथवर अजून तरी ठीक होते. मात्र माझ्या डोक्यातील टिकटिक सुरू झाली.

मोठ्या शहरात असतात तसेच इथेही वाहतुकीचे ताणतणाव होते. पुण्यातल्या स्वारगेट चौकात, हिंजवडी भागात संध्याकाळी किंवा अटलांटातील २८५ वरील संध्याकाळची जीवघेणी गर्दी याची आठवण झाली. गाडी मुंगीच्या गतीने अरुषाच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करत होती. आता मात्र मला प्लॅन बी करावा लागणार होता. कुठल्याही परिस्थितीत विमान चुकवणे परवडणारे नव्हते. एखाद्या थरारक चित्रपटाला शोभेल असे सगळे चालले होते. अरुषा आणि मोशीच्यामध्ये किलीमांजारो विमानतळ आहे. तेव्हा मोशीला जाऊन परत मागे येऊन वेळ घालवण्यापेक्षा विमानतळाच्या फाट्याजवळ उतरावे. एमजे सफारी हॉटेलातून माझ्या बॅगा, लॅपटॉप वगैरे घेऊन फाट्याजवळ येऊन मला विमानतळावर घेऊन जाण्याचे मी व एमजे सफारीने फोनवर ठरवले. अर्थात अजून वेळ वाया गेला तर.. मला शक्यतो मोशीला जाऊन पटकन आंघोळ करून स्वतःचे सामान स्वतःच घ्यावे असे वाटत होते. न जाणो एखादी बॅग, लॅपटॉप हॉटेलवर राहिला तर! गाडी अरुषाच्या बाहेर आली. आता सहप्रवाशांनाही या थरारक प्रसंगाची गंमत वाटत होती. ड्रायव्हरने गाडी हाणली. सुदैवाने हायवेवर रस्ता मोकळा मिळाला. पावणेदहाला मोशीत पोहोचलो. बरोबर दहा वाजता एअरपोर्टला जाणारी टॅक्सी येणार होती. माझ्याकडे आता पंधरा मिनिटे होती. एमजे सफारीने हॉटेलला माझ्या परिस्थितीची कल्पना दिलेली होती. त्यांनी लॉकर रुम माधून बॅग लॉबीत आणूनच ठेवल्या होत्या. गाडी हॉटेलच्या दारात आल्याबरोबर मी बाहेर उडी मारली. सर्व सहप्रवाशांना नमस्कारचमत्कार केले. ड्रायव्हरला घसघशीत टीप दिली. माझे सामान व ठेवलेल्या बॅगा घेऊन एका रुममध्ये गेलो. पटापट आंघोळ केली. चार दिवसांचे मळकट कपडे व किलीमांजारोचे कपडे एका बॅगेत कोंबले. उरलेल्या बॅगा भरताना वापराचे कपडे, भेटवस्तू, खाद्यपदार्थ वगैरे कोंबले. बॅगा कशाबशा बंद केल्या. त्यांची बरोबरच्या वजनकाट्याने वजने केली. आश्चर्य म्हणजे ती तंतोतंत बसली. बॅगा उरापोटावरून खालच्या मजल्यावर आणल्या. हॉटेलवालीला धन्यवाद दिले. ड्रायव्हर तयारच होता. गाडीत बॅगा टाकून तिथून निघालो. सव्वादहाचा सुमार मोशी गाव शांतनिवांत पहुडले होते. या स्वच्छ व कमालीच्या शांतनिवांत गावाचा निरोप घेतला. गाडी अरुषाकडे निघाली. काहीवेळाने विमानतळाचा फाटा लागला. गाडी उजव्या अंगाने घेऊन सुसाट निघाली. विमानतळावर वेळेत पोहोचलो. जीव भांड्यात पडला. ड्रायव्हरला टीप दिली. एमजे सफारीचे सीमकार्ड परत केले.

विमानतळ पुण्याच्या विमानतळाहूनही खूप लहान होता. देशोदेशीचे प्रवासी पाठीवर सॅक लावून रांगेत उभे होते. कुणी किलीमांजारो, कुणी सफारी, कुणी झांजीवरच्या आठवणी मनात साठवून निघत होते.

सुरक्षाकक्षातून जाताना मला 'पिवळ्यातापाच्या' लशीविषयी विचारले मात्र मी त्याचा सखोल अभ्यास केलेला होता. टांझानिया, तुर्कस्थान, अमेरिका, इथे प्रवास करताना पिवळ्या लसीची गरज लागत नाही. किंबहुना मी त्यासाठीच केनियाला जाणे टाळले होते. तिथे प्रवास केल्यास पिवळी लस लावून घेणे क्रमप्राप्त असते. मात्र विमानतळावरील अधिकाऱ्यांना ते पटत नव्हते. माझ्याभोवती चारपाच अधिकारी उभे राहून माझी चौकशी करताहेत हे पाहून बहुधा इतर विमानप्रवाशांना धास्ती वाटू लागली. मग विमानतळाच्या मुख्य अधिकाऱ्याला बोलावले. त्याने जुनेपुराणे पुस्तक आणले. त्यातील नियम बघितला. स्थानिक भाषेत त्याने बहुधा इतर अधिकाऱ्यांना झाडले. माझी माफी मागितली व मी बरोबर आहे असे त्यांना सांगितले. माझा जीव भांड्यात पडला. त्यामुळे विमानात बसेपर्यंत आफ्रिकेतील रोमहर्षक यात्रा सुरू होती.

सारा दिवस प्रचंड धावपळीत गेला. विशेषतः संध्याकाळ व रात्र. आता कुठे थोडी उसंत मिळाली. पहाटे दोनचे विमान वेळेवर निघाले. मी स्थानापन्न झालो. रनवेवरून विमानाने वेग घेतला. ते धावत असताना मी खिडकीतून बाहेरील आफ्रिका नजरेत साठवित होतो. डेंकालीच्या वेताळाची आफ्रिका. गूढरम्य कथांमध्ये गुंफलेली आफ्रिका. आयुष्यभर पुरेल इतक्या आठवणींची पुंजी गोळा करून जमिनीचा संपर्क तुटलेल्या विमानात गेल्या काही दिवसांची आळवणी करू लागलो. ते स्वच्छ टापटीपीचे मोशी गाव. १६००० फूट उंचावरून चढून गेल्यावर दिसलेला बर्फाच्छादित किलीमांजारो पर्वत, तिथून दिसलेला उगवता सूर्य, गरीब पण कष्टाळू पोर्टर्सचा नाच, किलीमांजारो सर केल्यावर झालेला आनंद, जंगलातील प्राणी, झाडावर हरणभक्षण करणारा बिबट्या, हत्तीशी झुंजणारा सिंह, काळाकभिन्न मसाई, त्सेत्से माशीचा पराक्रम, एक ना दोन...

खिडकी उघडून बघितले. रात्रीच्या अंधारात विमान इस्तंबूलच्या दिशेने चालले होते. खाली काही हजार फुटांवर जंगलातले प्राणी तेच हजारो वर्षांचे जीवन तसेच जगत होते. रोज नवीन येणाऱ्या गिर्यारोहकांना अंगाखांद्यांवर खेळवण्यासाठी किलीमांजारो तयार होत होता. आणि मी...पुण्यात जाऊन गणेशोत्सवाची स्वप्ने रंगवीत निद्रेच्या स्वाधीन झालो.

**गिरीश देसाई**
अटलांटा
email : gudesai@gmail.com
+1(678)674-6616